जा.क्र./पोउआ/वाह/नियोजन/3388/२०२१

**वाहतुक नियंत्रण अधिसुचना** दिनांक - 17/9/२०२१

पिंपरी चिंचवड महानगरपालिका अंतर्गत सांगवी वाहतुक विभागातील कोकणे चौक ते काळेवाडी फाटा पर्यंत उच्चक्षमता द्रुतगती मार्ग विकसीत करणेचे काम प्रगतीपथावर आहे. सदर रस्त्याचे कोकणे चौक येथे वाहनचालक वाहने पार्किंग करत असल्याने सदर चौकात वाहतुक कोंडी होऊन वाहतुकीस अडथळा होत आहे.

ज्याअर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतुक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सी आर - ३७/टी आर ए - २, दिनांक - २७/०९/१९९६ चे नोटीफिकेशन नुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६(१) (ए) (बी), ११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी आनंद भोईटे, पोलीस उप-आयूक्त वाहतुक शाखा, पिपंरी चिंचवड शहर, यापुर्वी काही निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन **तात्पुरत्या** स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

तरी नागरिकांनी याबाबत आपल्या काही सूचना असल्यास त्या पोलीस उपआयुक्त, वाहतूक शाखा पिंपरी चिंचवड यांचे कार्यालयात दि.१८/०९/२०२१ ते दि.०२/१०/२०२१ पर्यंत लेखी स्वरूपात कळवाव्यात. नागरिकांच्या सूचना व हरकती विचार करुन व अत्यावश्यक सेवेतील वाहने (उदा. फायरब्रिगेड, पोलीस वाहने, रुग्णवाहीका, इ.) खेरीज करुन अंतिम आदेश काढण्यात येईल.

**सांगवी वाहतुक विभाग अंतर्गत**

| अ.क्र. | ठिकाण | निर्बंध |
|---|---|---|
| १. | कोकणे चौक ते काळेवाडी फाटा पर्यंत उच्चक्षमता द्रुतगती मार्गाचे सुरुवातीस समांतर दोन्ही बाजुस १०० मीटर अंतरापर्यंत | नो पार्कींग |

तरी वरील ठिकाणी नोपार्किंग झोन करणेबाबत आदेश (अधिसुचना) करण्यात येत आहे.

(आनंद भोईटे)
पोलीस उप-आयुक्त,परि २
अति. कार्यभार,वाहतूक शाखा,
पिंपरी चिंचवड

प्रति,
जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी, नविन मध्यवर्ती इमारत, पुणे - ०१.

प्रत :
१) मा. पोलीस आयुक्त सो,पिंपरी चिंचवड शहर
२) पोलीस निरीक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.
/-सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमान पत्रातून प्रसिध्द करण्याची विनंती करावी.
३) प्रभारी अधिकारी सांगवी वाहतुक विभाग
४) कार्यकारी अभियंता स्थापत्य बीआरटीएस विभाग, पिंपरी चिंचवड
/- सदर ठिकाणी वरील वाहतुक निर्बधाचे फलक बसविणेची कार्यवाही होणेस विनंती आहे.